रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १७ ◆ अंक १२८
www.ramprahar.com
रविवार, २४ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा दणदणीत विजय



(वृत्त पान ३ वर..)

### अंतरंग

पेणमध्ये भाजपचे वर्चस्व कायम/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
महायुतीच्या विजयाचा खोपोलीत जल्लोष/७



# पेणमध्ये भाजपचे वर्चस्व कायम






## आमदार रविशेठ पाटील ६०,६७७ मतांनी विजयी

**पेण : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदारसंघातील २०२४च्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून, भाजपाचे उमेदवार रविशेठ पाटील यांनी ६०,६७७ मतांनी प्रचंड विजयी मिळवली आहे. त्यांच्या विजयामुळे भाजपने या मतदारसंघातील आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

दरम्यान, पेण विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत एकूण तीन लाख ७९७९ मतदारांपैकी ७३.०२ टक्के म्हणजेच दोन लाख २४८९२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये एक लाख १६०८७ पुरुष आणि एक लाख ८८०५ महिला मतदारांचा सहभाग होता. ही निवडणूक सात उमेदवारांमध्ये झाली.

रविशेठ पाटील यांच्या नेतृत्वाखालील प्रभावी प्रचार आणि जनतेच्या विश्वासामुळे त्यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला. त्यांच्या मुख्य प्रतिस्पर्धी, शिवसेना उबाठाचे उमेदवार प्रसाद भोईर, दुसऱ्या क्रमांकावर राहिले, तर शेकापचे अतुल म्हात्रे तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले.

२० नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात विधानसभेचे मतदान पार पडले. या निवडणुकीत पेण मतदारसंघातील जनतेने भाजपाच्या नेतृत्वावर पुन्हा विश्वास दाखवून रविशेठ पाटील यांना विजयश्री दिली. या विजयाने भाजपच्या गडाला अधिक मजबुती दिली आहे.

**जनतेचे मी आभार मानतो आणि आपल्या विकासकामांवर भर देण्याचे वचन दिले. हा विजय माझा नाही, तर पेणच्या जनतेचा आहे. पुढील पाच वर्षांत विकासाची नवी गती देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.**
**–आमदार रविशेठ पाटील**

इतर उमेदवारांनीही निवडणुकीत आपले प्रयत्न केले, मात्र मतदारांनी भाजपच्या धोरणांवर विश्वास ठेवला. शिवसेनेच्या नवख्या प्रसाद भोईर यांनी काही अंशी टक्कर दिली असली तरी, मोठ्या मतांच्या फरकाने ते मागे पडले.

या निकालामुळे भाजपा पक्षाच्या भविष्यासाठी सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. पेणमध्ये शिवसेना उबाठाला अपेक्षित यश मिळू शकले नाही, तर शेकाप आणि अन्य पक्षांचे उमेदवार दुय्यम भूमिकेत दिसले. रविशेठ पाटील यांच्या विजयामुळे पेण विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणे भाजपच्या बाजूने झुकली आहेत. आगामी काळात विकासाच्या कामांवर जनतेची नजर असेल.

### निकालाचा आढावा

- *रविशेठ पाटील (भाजप) : १,२४,६३१ मते*
- *प्रसाद भोईर (शिवसेना उबाठा) : ६३,८२१ मते*
- *अतुल म्हात्रे (शेकाप) : २९,१९१ मते*
- *मंगल पाटील (अभिनव भारत पार्टी) : २,२६६ मते*
- *देवेंद्र कोळी (वंचित बहुजन आघाडी): १,७०१ मते*
- *अनुजा साळवी (बहुजन समाज पार्टी) : १,२४१ मते*
- *विश्वास बागूल (अपक्ष) : १,२०३ मते नोटा : २,४७३ मते*

# अलिबागमध्ये आमदार महेंद्र दळवींचा ऐतिहासिक विजय





**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी अलिबाग विधानसभा मतदारसंघात ऐतिहासिक विजय मिळवला. त्यांनी शेकापच्या चित्रलेखा पाटील यांचा २९ हजार ५६५ मतांनी पराभव केला. शेकापचा बालेकिल्ल समजल्या जाणारा अलिबाग विधानसभा मतदारसंघांत सलग दोन वेळा निवडून येण्याचा इतिहास आमदार महेंद्र दळवी यांनी केला.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी, शेकापच्या चित्रलेखा पाटील आणि अपक्ष दिलीप भोईर यांच्या तिरंग लढत झाली. यात आमदार महेंद्र दळवी यांना एक लाख १३ हजार ५९९ मते मळाली. चित्रलेखा पाटील यांना ८४ हजार ३४ तर दिलीप भोईर यांना ३३ हजार २१० मते मिळाली. आमदार महेंद्र दळवी यांनी २९ हजार ४८८ मतांनी विजय मिळवला.

अलिबाग विधासनसभा मतदारसंघ हा शेकापचा बालेकिल्ला समजला जातो. १९५२ पासून १० वेळा येथून शेकापचे उमदवार विजीय झाले. शेकाप विरोधक सहा वेळा निवडून आले आहेत. द.का. कुंटे (१९५२), साली द. कृ. खानविलकर (१९६२), ना.का. भगत (१९७२), मधूकर ठाकूर (२००४) हे काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले होते. हे चारही जण या मतदारसंघातून एकदाच निवडून आले.

अलिबाग मतदारसंघातून शेकापचे ॲड. दत्ता पाटील सहा वेळा विजयी झाले. त्यात सलग चार वेळा निवडून येण्याचा इतिहास त्यांनी घडवला आहे. शेकापच्या मीनाक्षी पाटील तीन वेळा विजयी झाल्या. त्या सलग दोन वेळा त्यांनी विजय मिळवला होता. शेकापचे पंडित पाटील एकदा विजयी झाले. शेकाप वगळता इतर पक्षाचा उमेदवार अलिबाग मतदारसंघातून सलग दोन वेळा निवडून आला नव्हता. ही परंपरा अमदार महेंद्र दळवी यांनी खंडित करून इतिहास घडवला. २०१९ व २०२४ असे सलग दोन वेळा महेंद्र दळवी निवडून आले आहेत. आमदार महेंद्र दळवी २०१९ साली प्रथम अलिबाग विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले तेव्हा ते अलिबाग विधानसभा मतदारसंघात निवडून आलेले ते शिवसेनेचे पहिले आमदार ठरले होते. २०२४ साली ते पुन्हा शिवसेनेच्या तिकीटावर निवडून आले आहेत.

# ‘माणगावकरांनी आदिती तटकरेंना विकासकामांची पोचपावती दिली’

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आदिती तटकरे या दणदणीत मतांनी विजयी झाल्या. या निवडणुकीत माणगावकरांनी आदितीताईंना विकास कामांची व सततचा असणारा जनसंपर्क याची पोचपावती दिली असल्याचे माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातून महायुतीच्या आदितीताई तटकरे किती मताधिक्याने विजयी होतात याची उत्सुकता मतदार संघातील जनतेला होती. मतमोजणीच्या सुरवातीच्या पोस्टल मतदानापासून ते पहिल्या फेरीपासून अगदी शेवटच्या फेरीपर्यंत आदिती तटकरे यांचे मताधिक्य वाढतच राहिले. विरोधकांना या निवडणुकीत अदितीताईंनी चारीमुंड्या चीत केले. आदितीताईंना या निवडणुकीत तब्बल एक लाख १६ हजार ५० इतके मतदान मिळून त्या विरोधकांपेक्षा ८२ हजार ७९८ इतके मताधिक्य अधिक मिळवून विजयी झाल्या. या निवडणुकीत तटकरे कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून केलेल्या जनसेवेचे फलित त्यांना मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमचे नेते खा.सुनील तटकरे यांनी या संपूर्ण मतदार संघात आपल्या चाळीस वर्षाच्या राजकारणात विकास कामांचा झंझावात निर्माण केला.

माणगाव–रोहा विधानसभा मतदार संघ असताना तटकरे साहेबानी माणगाव, रोहा, तळा या तीन तालुक्यांचा विकास केला. २००९ मध्ये हा मतदार संघ बरखास्त होऊन नवीन १९३ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची निर्मिती झाली. या मतदार संघातून खा.तटकरे हे पाहिल्याचवेळी निवडून आल्यावर त्यांनी विकास कामाबाबत म्हसळा, श्रीवर्धनचा विकास कामांचा बॅकलॉग भरून काढला. त्यानंतर सन २०१९ मध्ये व आता पुन्हा २०२४ मध्ये खा.तटकरे हे रायगड लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. २०१९मध्ये श्रीवर्धनमधून त्यांची कन्या आदिती तटकरे यांना विधानसभेसाठी संधी देण्यात आली.

महायुतीच्या सरकारमध्ये ताईंना महिला व बालविकास खात्याची मंत्री म्हणून संधी मिळाली. या संधीचे ताईंनी सोने करीत या विभागामार्फत विविध वैयक्तिक लाभाच्या लोकाभिमुख योजना आणल्या. यापैकी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात अधिक प्रभावी झाली.

# आमदार महेंद्र दळवींनी अफाट विकास केला –जमीर बकवाल

**मुरुड : प्रतिनिधी**



अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी आपल्या मतदार संघाचा अफाट विकास केला आहे. त्यामुळे त्यांना दुसऱ्यांना आमदार बनण्याची संधी मिळाली आहे, असे प्रतिपादन नांदगाव पंचक्रोशी विभगातील सामाजिक कार्यकर्ते जमीर बकवाल यांनी पत्रकारांशी संवाद साधतेवेळी केले.

ते म्हणाले की, राज्य शासनाकडून विविध निधी मिळवून त्यांनी मुरूडसह अलिबाग मतदार संघ मोठ्या प्रमाणात विकसित केला आहे. त्याचप्रमाणे त्यांचे साधे राहणीमान व प्रत्येक व्यक्तीची अस्था पूर्वक विचारपूस तसेच प्रश्नाची त्वरित सोडवणूक यामुळे सर्वसामान्य नागरिकांची नाळ त्यांच्याशी जुळली गेली आहे. आमदार दळवी स्वतःचा फोन स्वतः उचलतात कोणताही पिए चां हस्तक्षेप ठेवलेला नाही. त्यामुळे जनमानसात त्यांची प्रतिमा उंचावली असून असंख्य लोक त्यांच्याशी जोडले गेले आहेत. अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्रातील लोकांनी त्यांना आमदार बनवून दुसऱ्यांदा संधी दिली आहे.

बकवाल यांनी सांगितले की, मतमोजणी च्या वेळी प्रत्येक भागातून त्यांना लीड मिळवून ते मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. सर्व सामान्य लोकात राहणारे व लोकांच्या समस्या तातडीने सोडल्यामुळे त्यांच्या मागे मोठा जनसमुदाय जोडला गेला आहे.शिवसेना त्यांनी या मतदार संघात वाढवली व बळकट केली आहे.मतदारांनी चाणाक्ष पद्धतीने मतदान करून एक चांगला व सक्षम लोकप्रतिनिधी निवडून दिल्याबद्दल बकवाल यांनी मतदारांचे आभार व्यक्त केले आहेत. या पुढे अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचा असाच विकासाचा ओघ सुरू ठेऊन जास्तीत जास्त विकास कामे राबवून मतदारांचा विश्वास संपादन करतील, असा विश्वास समाजसेवक जमीर बकवाल यांनी व्यक्त केला आहे.

# ‘अलिबागचा दुसऱ्यांदा आमदार होण्याचा बुहमान’

**अलिबाग : प्रतिनिधी**



माझा हा विजय ऐतिहासिक आहे. अलिबागमध्ये शेकाप व्यतिरिक्त सलग दुसऱ्यांदा कुठल्याच पक्षाचा आमदार झाला नाही तो बहुमान मला मिळाला. तो इथल्या जनतेने दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो, असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.

गेली पाच वर्षे महाराष्ट्र सरकारमध्ये काम करीत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने माझ्या मतदार संघात अनेक विकास कामे पूर्ण झाली आहेत. शासनाच्या अनेक योजना जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम महायुतीच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांनी केले. मी केलेले काम इथल्या जनतेला भावलेले दिसतेय. लाडकी बहीण योजनेमुळे आमच्या माता भगिनी सरकारवर खुश असल्याचे यावेळच्या मतदानातून दिसत आहे. त्यामुळे माझा विजय सोपा झाला. आज विजयानंतर महायुतीचे कार्यकर्ते मला शुभेच्छा देण्यासाठी आले हा माझयासाठी भावनिक क्षण असल्याचे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.

राज्यात महायुतीला मिळालेले यश हे अडीच वर्षांतील एकनाथ शिंदे याच्या नेतृत्वाखालील सरकारचे यश आहे. त्यांनी केलेले काम तळागाळातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले आहे. अशाच पदधतीने पुन्हा पाच वर्षे सर्वांना बरोबर घेवून जाण्यासाठी एकनाथ शिंदे हेच पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत अशी अपेक्षा दळवी यांनी व्यक्त केली. महायुती भक्कम आहे, परंतु एकनाथ शिंदे यांची अडीच वर्षातील कामगिरी पाहता तेच पुन्हा मुख्यमंत्री होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाच वर्षांत मतदार संघात अनेक विकास कामे झाली. म्हणून जनतेने मला पुन्हा सेवेची संधी दिली आहे. पुढील काळात उर्वरीत काम पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न राहील. आणि कुणाला बोट दाखवायला जागा ठेवणार नाही, असेही दळवी यांनी सांगितले.

# महाडमध्ये आमदार भरत गोगावलेंचा चौकार

## मतदारसंघाचा मोडला रेकॉर्ड

**महाड : प्रतिनिधी**

संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागून राहिलेल्या महाड, माणगाव, पोलादपूर १९४ विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जोरदार टक्कर झाली. यामध्ये महायुतीचे उमेदवार भरत गोगावले यांनी चौथ्यांदा विजय मिळवला आहे. महाड विधानसभा मतदारसंघांमध्ये चौथ्यांदा आमदार होण्याचा मान पटकावून येथील रेकॉर्ड मोडून टाकला आहे. २६२१० चे मताधिक्य घेत विजय मिळवला आहे.



१९४ महाड माणगाव पोलादपूर विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे भरत गोगावले तर महाविकास आघाडी कडून उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून स्नेहल जगताप या निवडणूक रिंगणात होत्या. त्याचबरोबर बहुजन समाज पार्टी, वंचित बहुजन आघाडी, असे एकूण पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. आज सकाळी सात वाजल्यापासून मतदान मोजणीसाठी सुरुवात झाली. सुरुवातीला टपाली मतदान मोजणी झाल्यानंतर एकूण २९ राऊंड घेण्यात आले. सुरुवातीपासूनच निजामपूर माणगाव विभागातून भरत गोगावले यांना मताधिक्य मिळत गेले. हे मताधिक्य सर्व फेऱ्यांमध्ये कायम राहिले. महाड शहरात देखील गोगावले यांना मताधिक्य मिळाले. सुरुवातीला झालेल्या टपाली मतमोजणी मध्ये भरत गोगावले यांना ६०० मतांची आघाडी मिळाली आणि इथूनच मताधिक्यांची आघाडी कायम राहिली. भरत गोगावले यांनी २६२१० मताधिक्य घेत विजय मिळवला आहे.

आज सकाळपासूनच मतदान मोजणी केंद्राच्या बाहेर दोन्ही उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. मताधिक्य कोणाला मिळेल याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले होते. यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी मतमोजणी केंद्राच्या बाहेर प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवला होता. या मतदारसंघातील उमेदवार असलेल्या अमृता वाघमारे यांना १२१२, आनंदराज घाडगे १५१०, प्रज्ञा खांबे १०३४ तर नोटाला ८८९ मते मिळाले आहेत.

महाड विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी सुरू असतानाच महायुतीचे उमेदवार भरत गोगावले यांना कायम मताधिक्य राहिल्याने स्नेहल जगताप यांनी आमदार भरत गोगावले यांना मीडियासमोर आणून त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या. स्नेहल माणिक जगताप हिच्या या कृतीने कौतुक होत आहे.

या मतदारसंघांमध्ये यापूर्वी तीन वेळा निवडून आलेले आमदार चौथ्यांदा मात्र निवडून आलेले नाहीत. यामुळे भरत गोगावले हे देखील चौथ्यांदा निवडून येतात की नाही याबाबत तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू होते. भरत गोगावले यांच्यासमोर देखील हे आव्हानच होते. हे आव्हान भरत गोगावले यांनी स्वीकारून या मतदारसंघाचा रेकॉर्ड मोडून टाकला आहे. मी चौथ्यांदा निवडून येणारच असा दावा भरत गोगावले यांनी केला होता. आणि तो खरा करून दाखवला.

# महाराष्ट्रात महायुतीचा महाविजय

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२८
www.ramprahar.com
राम प्रहर
रविवार, २४ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांच्या महायुतीने प्रतिस्पर्धी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष व सहकाऱ्यांच्या महाविकास आघाडीवर एकतर्फी मात करीत मोठे यश संपादन केले आहे. या वेळी इतर पक्ष व अपक्ष चांगल्या संख्येने निवडून येतील असा अंदाज वर्तविण्यात आला होता, मात्र तोही फोल ठरला. भाजप महायुतीने शनिवारी (दि. २३) निकाल जाहीर झाल्यापासून जी आघाडी घेतली ती कायम ठेवत पुन्हा एकदा सत्ता मिळवली आहे.

महाराष्ट्रातील विजय हा विकासाचा आणि सुशासनाचा विजय आहे. महायुतीला ऐतिहासिक जनादेश



दिल्याबद्दल माझ्या महाराष्ट्रातील भगिनी आणि बांधवांचे, विशेषतः राज्यातील तरुण आणि महिलांचे मनःपूर्वक आभार. ही आपुलकी आणि जिव्हाळा अतुलनीय आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आमची आघाडी कार्यरत राहील, याची मी जनतेला ग्वाही देतो. जय महाराष्ट्र!,

–नरेंद्र मोदी, पंतप्रधान

# महाविकास आघाडीला धोबीपछाड; इतर पक्षांचीही वाताहत

## जनतेने सावत्र भावांना जोडे दाखवले –मुख्यमंत्री शिंदे

मुंबई : प्रतिनिधी




विधानसभेच्या दणदणीत यशानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानून विरोधकांचा जोरदार समाचार घेतला. महायुतीच्या नेत्यांकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, माझ्या लाडकी बहिणींचे मनापासून अभिनंदन करतो. आम्ही केलेल्या विकासकामांची जनतेला पोचपावती मिळाली. जनतेने सावत्र भावांना जोडे दाखवले आहेत. त्यामुळे जनतेला त्रिवार वंदन करतो. महायुतीला आशीर्वाद दिल्याबद्दल जनतेचे आभार मानतो.

ते पुढे म्हणाले की, राज्यात शिवसेना, भाजपा, एनसीपी आणि इतर घटक पक्षांनी आम्ही मिळून निर्णय घेतले. इतिहासात पहिल्यांदाच असे निर्णय घेण्यात आले. सर्व कामे थांबवण्यात आली होती. ती आम्ही हाती घेतली. कोस्टल रोड, मेट्रो, ज्याचे भूमिपूजन मोदी साहेबांनी केले त्याचे उद्घाटनेही त्यांनी केले. राज्याचा विकास करत असताना आम्ही सर्व घटकांचा विचार केला. अडीच वर्ष आम्ही सर्व कामे वेगाने केली. कल्याणकारी योजना आणल्या. शेतकऱ्यांसाठी योजना आणल्या. वीज पंपाचे बिल माफ केले. आजचा दिवस ऐतिहासिक आहे. महाविकास आघाडीने बंद पाडलेल्या कामे आम्ही सुरू केली. दोन अडीच वर्षात आम्हाला केंद्र सरकारने मदत केली. आम्ही काम केल्याने राज्यातील जनतेने कौल दिला. आम्ही आमच्या विजयाचे श्रेय जनतेला आणि आमच्या कार्यकर्त्यांना देतो, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### महायुतीचे सरकार सर्वसामान्यांसाठी

आम्ही फक्त कागदावर योजना ठेवल्या नाहीत. यामुळे लोकांना कळाले की, हे सरकार सर्वसामान्यांसाठी आहे. जनतेने पूर्णपणे विकासाला निवडले आहे. मी आणि आमचे दोन्ही उपमुख्यमंत्री २४ तास लोकांसाठी होतो. विकासाला लोकांनी महत्त्व दिले. आता आमची जबाबदारी वाढली आहे. आमच्या मागे केंद्र सरकार ताकदीने उभे आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या वेळी म्हणाले.






या ऐतिहासिक जनादेशासाठी महाराष्ट्राच्या जनतेला कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्राने विकासाबरोबरच संस्कृती आणि राष्ट्राला सर्वोच्च स्थानी ठेवणाऱ्या महायुतीला एवढे प्रचंड बहुमत देऊन संभ्रम आणि खोटेपणाच्या आधारे संविधानाचे नकली हितचिंतक बनणाऱ्यांच्या दुकानाला टाळे ठोकण्याचे काम केले आहे. हा विजय प्रत्येक महाराष्ट्रवासीयाचा विजय आहे.

–अमित शाह, भाजप नेते

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घडविला इतिहास

### सलग चौथ्यांदा निवडून येत मारला विजयाचा चौकार | बाळाराम पाटलांच्या पराभवाची झाली हॅट्ट्रिक





(अधिक छायाचित्रे पान ६ आणि ८ वर..)

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेलच्या विकासासाठी दिवसरात्र एक करून काम करणारे महायुतीचे उमेदवार व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुन्हा एकदा आणि सलग चौथ्यांदा दणदणीत विजय मिळवत विजयाचा चौकार मारला आणि याच धर्तीवर विधानसभा निवडणुकीत शेकापचे बाळाराम पाटील यांच्या पराभवाचीही हॅट्रिक झाली. तर पनवेलचे विकासपुरुष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलमध्ये पुन्हा एकदा इतिहास घडवला आहे. या निमिताने पक्षश्रेष्ठींनी दाखवलेला विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुन्हा एकदा सार्थ ठरवला आहे. (पान ५ वर..)

मला चौथ्यांदा निवडून दिल्याबद्दल मी महायुतीतील प्रत्येक कार्यकर्ता व मतदाराचे मनपूर्वक आभार मानतो. पनवेलच्या विकासाचा आलेख उंचावण्याची माझी जबाबदारी आहे ती जबाबदारी मानून यापुढेही कायम काम करत राहीन. पक्ष नेतृत्वाने माझ्यावर विश्वास टाकला त्या सर्व मान्यवरांचे मी आभार मानतो.

–आमदार प्रशांत ठाकूर

### शेकापला मतदारांनी नाकारले!

दरम्यान, सुरुवातीला आघाडी मिळवल्यानंतर शेकापच्या गोटात उत्साह भरला होता, मात्र काही क्षणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी मतांची आघाडी मिळवत ती कायम ठेवली आणि शेकापला वरती डोकेच काढून दिले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा बाळाराम पाटील आणि शेकापला मतदारांनी सपशेल नाकारले आणि तशीच दशा रायगड जिल्ह्यातही झाली.





## महायुतीच्या एकजुटीचा विजय, जनतेसमोर नतमस्तक -देवेंद्र फडणवीस

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या आज लागलेल्या निकालांमध्ये महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर भाजपाचे महाराष्ट्रातील प्रमुख नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावूक प्रतिक्रिया दिली आहे. महायुतीच्या एकजुटीचा विजय झाला असून मी जनतेसमोर नतमस्तक आहे, असे फडणवीस या वेळी म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, हा विजय राष्ट्रीय विचारांच्या संघटनांचा विजय आहे. महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीने मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याविरोधात जनजागृती करणारे विविध पंथांचे जे आमचे संत आहेत. त्यांचाही हा विजय आहे. अशा सगळ्यांचा हा विजय आहे. वाड्या वस्त्यांमध्ये जाऊन ज्यांनी ही जनजागृती केली, त्यांचा हा विजय आहे. तसेच खऱ्या अर्थाने आमचे महायुतीचे जे लाखो कार्यकर्ते आहेत. त्या कार्यकर्त्यांचा हा विजय आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रामदासजी आठवले. आमचे सगळे मित्रपक्ष या सगळ्यांचा हा विजय आहे. या सर्वांच्या प्रयत्नामुळे हा प्रचंड मोठा विजय मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या विजयाच्या निमित्ताने मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही अभिनंदन करतो. त्यांनी महाराष्ट्रात येऊन आमच्या कार्यकर्त्यांमध्ये उर्जा भरली. आमच्या सगळ्या राष्ट्रीय नेतृत्वाने आम्हाला मार्गदर्शन केले तसेच आमच्या सर्व वरिष्ठ नेत्यांनी आमच्या विजयात हातभार लावला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेसमोर आम्ही नतमस्तक आहोत. याच्यापेक्षा जास्त आज इथे काही बोलताच येत नाही. ज्या महाराष्ट्राच्या जनतेने हे प्रेम दिले आहे, तिला मी साष्टांग दंडवत घालतो. महाराष्ट्रात जो काही विषारी प्रचार झाला होता. त्याला महाराष्ट्राच्या जनतेने आपल्या कृतीमधून उत्तर दिले आहे, असे भावूक उदगार देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

मी म्हणालो होतो की आम्ही आधुनिक अभिमन्यू आहोत. आम्ही चक्रव्युह तोडून दाखवू, तो चक्रव्युह तुटलेला आहे. तसेच महाराष्ट्र हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा आहे, असा दावाही देवेंद्र फडणवीस यांनी केला.

## लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली –अजित पवार

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील जनतेने विकासाकडे बघून महायुतीला प्रचंड अशा प्रकारचे यश मिळवून दिले आहे. त्याबद्दल महायुतीच्या वतीने जनतेचे आभार मानतो, असे उपमुख्यमंत्री अजित पवार विजयानंतर प्रतिक्रिया देताना म्हणाले. त्यांनी या विजयाचे श्रेय माझी लाडकी बहीण योजनेला दिले.

लाडकी बहीण योजना गेमचेंजर झाली. अंडरकरंट असा बहिणींनी दाखवला की सगळे उताणे पडले, आडवे पडले, हे माझे स्पष्ट मत आहे. आमच्यावर जबाबदारी वाढलेली आहे. एवढ्या प्रचंड बहुमताने सरकार आले आहे. मी राजकारणात आल्यापासून २२२ आणि तसे २२५ महायुतीला जागा मिळाल्या. एवढे कधी पाहिले नाही. या यशाने हुरळूनदेखील जाणार नाही. जसे जसे आकडे पाहत होतो, तेव्हा आर्थिक गोष्टी समोर येत होत्या. आर्थिक शिस्त समोर आणू, आम्हाला याचा अनुभव आहे. आमच्या पाठिशी केंद्र सरकार आहे. त्याचा आधार आहे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

महाराष्ट्रातील सर्व विभागातून आम्हाला मतदान झाले आहे. लोकसभेला मराठवाड्यात केवळ एक जागा मिळाली होती, असे शरद पवार म्हणाले.

### जनतेचे मानावे तेवढे आभार कमी

आमच्या महायुतीवरील जबाबदारी वाढलेली आहे. जनतेचे मानावे तेवढे आभार कमी आहेत. पाच वर्षे एकोप्याने काम करेल. अतिशय चांगल्या पद्धतीने राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

## रायगड जिल्ह्यात शत प्रतिशत महायुती!

अलिबाग : रामप्रहर वृत्त

रायगड जिल्ह्यात विधानसभेच्या सातही जागा महायुतीने जिंकल्या आहेत. भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर (पनवेल) आणि शिवसेनेचे आमदार भरत गोगावले (महाड) यांनी सलग चौथ्यांदा निवडून येत विजयाचा चौकार लगावला आहे.



जिल्ह्यात पनवेल, उरण, कर्जत, पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड हे सात विधानसभा मतदारसंघ आहेत. यामध्ये अनुक्रमे आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर (भाजप), महेश बालदी (भाजप), महेंद्र थोरवे (शिवसेना), रविशेठ पाटील (भाजप), महेंद्र दळवी (शिवसेना), आदिती तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि भरत गोगावले (शिवसेना) हे आमदार म्हणून गेल्या निवडणुकीत निवडून आले होते. महायुतीचे सर्वच्या सर्व विद्यमान आमदार विजयी झाले आहेत. त्यांनी अनुक्रमे बाळाराम पाटील (शेकाप), प्रितम म्हात्रे (शेकाप), सुधाकर परशुराम घारे (अपक्ष), प्रसाद भोईर (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), चित्रलेखा पाटील (शेकाप), अनिल नवगणे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष) आणि स्नेहल जगताप (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) यांना पराभवाची धूळ चारली.

## उरण मतदारसंघात मविआ, शेकापला धूळ चारत आमदार महेश बालदी विजयी

उरण : प्रतिनिधी, वार्ताहर

उरण विधानसभा मतदार संघात भाजपचे आमदार महेश बालदी यांना मतदारांचा मोठा कौल मिळाला असून शेकापचे उमेदवार प्रितम म्हात्रे व शिवसेना (उद्धव ठाकरे गट) महाविकास आघाडीचे उमेदवार मनोहर भोईर यांना पराभवाची धूळ चारली आहे.

आमदार महेश बालदी यांना एकूण ९५ हजार ५५ मते मिळाली असून, शेकापचे तरुण उमेदवार प्रितम म्हात्रे यांची विधानसभेची पहिली निवडणूक असून, यांना दुसऱ्या क्रमांकाची ८७ हजार २४८ मते मिळाली त्यांचा महेश बालदी यांनी सात हजार ८०७ मताधिक्याने पराभव केला आहे. मनोहर भोईर हे २०१९ पासून सलग दोनदा पराभूत होऊन या निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकावर फेकले आहेत.



भोईर यांना ७१ हजार २७६ मतांवर समाधान मानावे लागले आहे. त्यांना २३ हजार ७७९ मताने पराभव पतकरावा लागला आहे. २०१९ला अपक्ष आमदार म्हणून उरण विधानसभा मतदार संघात प्रतिनिधीत्व करीत असलेले आमदार महेश बालदी यांना विकास कामांच्या जोरावर येथील जनतेने कौल दिला आहे. (पान ५ वर..)

### यापुढेही विकासकामांना सर्वाधिक प्राधान्य देणार -आमदार महेश बालदी

उरण विधानसभा मतदार संघातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी या निवडणुकीत घेतलेली प्रचंड मेहेनत, मतदार संघातील विकासकामे आणि राज्य सरकारने लोकसभेनंतर कार्यान्वित केलेली लाडकी बहीण योजना घराघरातील बहिणीपर्यंत पोहचविल्याने हा मोठ्ठा विजय संपादन केला आहे. याशिवाय यापुढेही उरण विधानसभा मतदार संघातील जनतेच्या विकास कामांना सर्वाधिक प्राधान्य देण्यासाठी राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सर्वांना सोबत घेऊन पुढील वाटचाल करू, असे आमदार महेश बालदी म्हणाले.

हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित नमक हराम हा माझा राजेश खन्नाच्या आवडत्या पाच चित्रपटातील एक. यश चोप्रा दिग्दर्शित इत्तेफाक, शक्ती सामंता दिग्दर्शित आराधना, हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित आनंद आणि मोहनकुमार दिग्दर्शित अवतार हे माझे राजेश खन्नाचे आणखी आवडते चित्रपट. (ही हिट लिस्ट दहापर्यंत सहज जातेय.)

# 'नमक हराम' ५१ वर्षे

## बडी मुश्किल से मगर दुनिया मे दोस्त मिलते है....

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

अमिताभ बच्चनच्या माझ्या आवडत्या पाच चित्रपटात मी 'नमक हराम'चा खास उल्लेख करतोच. प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर व शराबी, रमेश सिप्पी दिग्दर्शित शोले, मनमोहन देसाई दिग्दर्शित अमर अकबर अ‍ॅन्थनी हे माझे अमिताभचे टॉप फाईव्हमधील चित्रपट. ही हिट लिस्ट दहाच्याही अगदी सहज पुढे जाईल.

आपण वयाच्या कोणत्या काळात चित्रपट पाहतोय, तेव्हाचा आपल्यावरचा चित्रपटाचा प्रभाव, आपली चित्रपटाबाबतची समज यात अनेक गोष्टी समाविष्ट असतात.

'नमक हराम' मी शालेय वयात असताना पाहिला. राजेश खन्नाच्या क्रेझने मंतरलेले ते दिवस. एक प्रकारचा तो हिस्टेरिया होता. अशातच जंजीर आला. ११ मे १९७३ रोजी तो प्रदर्शित होईपर्यंत हिंदी चित्रपटाचा वेगळा इतिहास लिहायची सुरुवात होईल असे कोणीही भविष्य वर्तवले नव्हते. मगर होनी को कौन टाल सकता है? सलिम जावेद लिखित पटकथा व संवाद आणि प्रकाश मेहराचे दिग्दर्शन असलेला जंजीर एक सर्वसाधारण मसालेदार मनोरंजक चित्रपट म्हणून प्रदर्शित झाला. मला आठवतंय डॉ. भडकमकर मार्गावरील इंपिरियल थिएटरमध्ये 'जंजीर' लागला आणि फर्स्ट शोपासूनच पब्लिकने अक्षरश: डोक्यावर घेतला. अ‍ॅन्ग्री यंग मॅन अर्थात सूडनायकाचे पर्व सुरू झाले. अमिताभच्या बाजूने वातावरण निर्माण होत गेले. त्याने राजेश खन्नाच्या यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग'च्या (मुंबईत रिलीज २७ एप्रिल १९७३) यशाचे वातावरण झाकोळून टाकले... अमिताभचे हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित अभिमान (रिलीज २७ जुलै १९७३), सुधेन्दू रॉय दिग्दर्शित 'सौदागर' (२६ ऑक्टोबर १९७३) यापाठोपाठ नमक हराम आला. (रिलीज २३ नोव्हेंबर १९७३. एकावन्न वर्ष पूर्ण झालीदेखील).

राजेश खन्नावरील प्रेमाखातर नॉव्हेल्टी चित्रपटगृहावर स्टॉलच्या दोन रुपये वीस पैसे तिकिटासाठी चक्क दीड तासापासून रांगेत उभे राहून हाती आलेले तिकीट घट्ट धरुन आत गेलो... चित्रपट जस जसा पुढे सरकू लागला तसा अमिताभही आवडू लागला... कौन है वो माय का लाल असे म्हणतच त्याचा जो उद्रेक झाला, संताप बाहेर पडला तोच हाऊसफुल्ल गर्दीतून प्रचंड टाळ्याच टाळ्या आणि शिट्ट्या...

'नमक हराम' आणखी एका गोष्टीसाठी आवडला. ती म्हणजे मैत्रीची गोष्ट. त्या काळात समाजात निखळ, निरपेक्ष मैत्रीचे




नाते ही स्वाभाविक गोष्ट होती. त्या नात्यात त्या काळात व्यवहार नव्हता.


खरंतर मैत्रीची गोष्ट आणि चित्रपट यांचे नाते अतिशय घट्ट आणि विविध पद्धतीचे...

पिक्चरच्या नावातून असो (दो यार, दोस्त, दोस्ताना, यार मेरा), थीममधून असो (दोस्ती, संगम, सागर, दिल चाहता है, जिंदगी मिलेगी ना दोबारा, आदमी सडक का, छीछोरे वगैरे अनेक), संवादातून असो (सिगारेट और दोस्त दोनों फिल्टर होना चाहिए. चित्रपट एक चालीस की आखरी लोकल), गाण्यातून असो (तेरी दोस्ती मेरा प्यार, यह दोस्ती हम नहीं तोडेंगे, यारी है इमान मेरा यार मेरी जिंदगी)...

यात एक हुकमी फंडा दोन मित्र एकाच युवतीच्या प्रेमात पडतात आणि मग 'दोस्त दोस्त ना रहा, प्यार प्यार ना रहा' (संगम) अथवा बस मेरे यार है, बाकी बेकार है जिसके बदलेमे कोई तो प्यार दे (सागर). रसिकांना हे प्रेम त्रिकोण आवडले. त्यात कुतूहल व उत्सुकताही होती.

'थ्री इडियट्स' या सगळ्यात पूर्ण वेगळाच. मैत्री कशीही असू शकते हे या चित्रपटातून अधोरेखित होतेय.

या सगळ्या मैत्री प्रवासात हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक हराम'मधील मैत्री पूर्णपणे वेगळी. आपल्या वडिलांच्या (ओम शिवपुरी) आजारात विकी (अमिताभ बच्चन) कारखाना सांभाळत असताना कामगार नेते बिपीन लाल (ए.के. हनगल) यांची त्याला एका प्रकरणात माफी मागावी लागते याचा बदला घेण्याच्या विकीच्या वृत्तीत त्याचा अतिशय जिवलग मित्र सोमू (राजेश खन्ना) मदत करण्यासाठीच चंदर नाव धारण करून त्याच ठिकाणी नोकरीला लागतो, पण कामगारांची सुख, दुःख, तणाव पाहून चंदरमधील माणुसकी जागी राहते आणि तो




विकीची समजून घालण्याचा प्रयत्न करतो. ते विकीच्या पित्याला आवडत नाहीत म्हणून ते कूटनीतीने चंदरचे बिंग कामगारांसमोरच फोडतात. त्यामुळेच खवळलेले कामगार चिडून जाऊन चंदरला बेदम मारहाण करतात. हे प्रकरण इतके आणि असे वाढते की मालकच चंदरचा अपघाती मृत्यू घडवून आणणात आणि आपल्यामुळेच आपल्या मित्राचे निधन झाले असे मानत विकी शिक्षा भोगतो...) चित्रपट फ्लॅशबॅकने सुरू होतो. हृषिकेश मुखर्जी, गुलजार यांच्या दिग्दर्शनीय वैशिष्ट्यात फ्लॅशबॅक खूपच महत्त्वाची गोष्ट असे.) चित्रपटात रेखा, सिमी गरेवाल, दुर्गा खोटे, ए.के. हनगल, ओम शिवपुरी, असरानी, मनमोहन, मंजू, जयश्री टी. रझा मुराद (आलमच्या भूमिकेत) इत्यादींवर भूमिका.

मैत्रीतील त्याग असा निःस्वार्थी वृत्तीचा आणि अशातच सोमू विकीला उद्देशून गाणे गातो, दिये जलते है फूल खिलते है, बडी मुश्किल से मगर दुनिया मे दोस्त मिलते है.... माझ्याप्रमाणेच अनेकांचे तरी हे अतिशय आवडते गाणे आहे. आनंद बक्षी यांच्या गीताना राहुल देव बर्मनचे संगीत. दिये जलते है, मै शायर बदनाम, नदीया से दरीया (सर्व किशोरकुमार) ही गाणी आजही



लोकप्रिय. एका प्रसंगात सोमू विकीला म्हणतो, जहा यार नहीं वहा प्यार नही, जहा प्यार नही वहा यार नहीं. (त्या काळात चित्रपटातील असे टाळीबाज डायलॉग एक वेगळीच संस्कृती होती. चित्रपट हे दृश्य माध्यम असले तरी आपल्या देशातील पब्लिकला कायमच क्या डायलॉग मारा यार हा फंडा महत्त्वाचा वाटला. गुलजार यांची संवाद संस्कृती वेगळी, त्यात साहित्यिक स्पर्श आणि सलिम जावेदची खूप वेगळी. कादर खानचे डायलॉग म्हणजे बब्बईय्या हिंदी...

दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी आशयघन स्वच्छ मनोरंजक चित्रपटासाठी ओळखले गेले. आपले चित्रपट सहकुटुंब सहपरीवार पाहिले जातात याचे त्या काळातील दिग्दर्शक भान ठेवत. मुसाफिर, अनाडी, असली नकली, सत्यकाम, आशीर्वाद, आनंद, गुड्डी, अभिमान, मिली, अर्जुन पंडित, गोलमाल, जुर्माना, नौकरी, आलाप, खुबसुरत, झूठ बोले कव्वा कांटे इत्यादी चित्रपटातून त्यांनी आपली वैशिष्ट्यपूर्ण वाटचाल जपली. आपली स्पेस निर्माण केली. त्यांचा स्वतःचा आपला हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला. ते स्वत: संकलकही असल्याने त्यांच्या दिग्दर्शनीय

मांडणीत एक विशिष्ट लय असे. अमिताभ व जया बच्चन यांच्यावर त्यांचे खास प्रेम. 'नमक हराम'मध्ये विकीची भूमिका साकारताना अमिताभने त्यांचा आपल्यावरचा विश्वास साध्य केल्याचे दिसले. हा चित्रपट प्रदर्शित होताच यातील अभिनयावरुन राजेश खन्ना श्रेष्ठ की अमिताभ यावरुन चित्रपट साप्ताहिके, मासिकांतून भरपूर लिहिले गेले आणि या दोघांच्या फॅन्समध्येही जुंपायची हे विशेष. साप्ताहिक रसरंगमध्ये वाचकांच्या पत्राच्या सदरात अनेक आठवडे यावर उलटसुलट बरेच



लिहिले गेले.

'बेकेट' या विदेशी चित्रपटावरुन 'नमक हराम' बेतला होता. मराठी रंगभूमीवरही याच थीमवर आधारित 'बेकेट' नाटक आले. नाटकाचे चित्रपटात माध्यमांतर करताना ते दृश्य माध्यमातून मांडण्याचे कसब कौशल्य हवे.

काळ बदललाय. सोशल मीडियाच्या युगात 'फेसबुक फ्रेन्ड' ही गोष्ट जन्माला आली. फोन अ फ्रेन्ड हीदेखील एक संकल्पना आहे. प्रत्यक्षात भेटायचे नाही. फोनवरची मैत्री असा प्रकार. इराणी हॉटेलमधील राऊंड टेबलाभोवती चार मित्र जमलेत व क्रिकेट, चित्रपट व राजकारणावर मनसोक्त मनमुराद गप्पा करताहेत आणि त्याच वेळेस ज्यूस बांक्समध्ये चार आण्याचे (कालांतराने आठ आण्याचे) नाणे टाकून गाणीदेखील ऐकताहेत ती दोस्तीच वेगळी होती.

या प्रवासात 'मैत्रीची गोष्ट सांगणारे' चित्रपट वेगळाच ठसा उमटवणारे. नमक हराम तर नक्कीच. रसिकांच्या किमान तीन चार पिढ्या ओलांडूनही या चित्रपटाभोवतीचे वलय कायम आहे हे तर केवढे मोठे यश. दूरदर्शन आला, मॅटीनी शोला पुन्हा पुन्हा येत राहिला, व्हिडीओवर



आला, मनोरंजन उपग्रह वाहिनीवरही आला. राजेश खन्ना व अमिताभ बच्चन या दोघांच्याही आवडत्या पाच चित्रपटात 'नमक हराम' आहे हे विशेषच.

# कवी, कथाकार, कादंबरीकार केशव मेश्राम

मराठी भाषेतील लेखक, कवी, नाटककार आणि समीक्षक अशी केशव तानाजी मेश्राम यांची ओळख राहिलेली आहे. त्यांची आज जयंती. यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...

केशव मेश्राम सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई येथून एमए (मराठी) झाले. त्यांना प्रारंभी मोलमजुरीची हलकी-सलकी कामे करावी लागली. नंतर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी केली. त्याच काळात 'रूपगंधा' नियतकालिकात काम केले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होताच रेल्वे खात्यातील नोकरीचा राजीनामा देऊन ते महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून रूजू झाले. तेथील एक वर्षाच्या नोकरीनंतर त्यांनी मुंबई येथे महर्षी दयानंद सरस्वती महाविद्यालयात अध्यापनकार्य केले. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातही प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून सेवा केल्यानंतर नोव्हेंबर १९९७मध्ये ते सेवेतून निवृत्त झाले.

वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून लेखन करणाऱ्या मेश्रामांचा मूळ पिंड कवीचा होता. 'कविता' हा त्यांचा विशेष आवडीचा साहित्यप्रकार. 'रहस्यरंजन' विशेषांकात त्यांची 'मेळा' ही पहिली कविता प्रसिद्ध झाली (१९५८). त्यानंतर त्यांनी सातत्याने काव्यलेखन केले. 'उत्खनन' (१९७७), 'जुगलबंदी' (१९८२), 'अकस्मात' (१९८४), 'चरित' (१९८९), 'कृतकपुत्र' (२००१), 'अनिवास' (२००५) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. डॉ. सुमतेन्द्र नाडिग यांच्या मूळ कन्नड भाषेतील चिंतनकाव्याचा त्यांनी 'दाम्पत्यगीता' हा मराठी भावानुवाद केला.

दलित कवितेच्या प्रारंभ काळातील एक प्रमुख कवी म्हणून त्यांचा उल्लेख होतो. सर्व प्रकारच्या अनुभवांना मोकळेपणाने सामोरी जाणारी त्यांची कविता असून पारंपरिक लयीतील तसेच मुक्तछंदात्मक लयीतील काव्यलेखनातून त्यांचे काव्यमूल्य सिद्ध होते. समाजातील दैन्य, दारिद्र्य, विषमता व जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतील अनास्था भाव हे त्यांच्या काव्यलेखनाचे विषय होत. नव्या पिढीच्या ध्येयशून्य तडजोडीची वेदनाही त्यांच्या काव्यात उमटलेली दिसते. म्हणूनच 'निसर्गाच्या विविध कळा – त्यांतल्या सर्व तरल छटांसह रंगवणार्या मेश्रामांच्या लेखनात शहरी जीवनातील रूक्ष व कडवट अनुभव तीव्रपणे चित्रित झालेले आहेत,' असे शांता शेळके यांना वाटते.

सर्वच काव्यसंग्रहांतून सामाजिक दुःखाची आच व्यक्त होते. जीवनातील रूक्ष, कडवट अनुभव काव्यात मांडताना त्यांच्या शब्दांना तीक्ष्ण शस्त्राची धार येते. ते वृत्तीने आत्मरत असले तरीही त्यांची सामाजिक बांधीलकीशी निष्ठा होती. 'उत्खनन', 'जुगलबंदी' या काव्यसंग्रहांमध्ये धर्मव्यवस्थेने लादलेल्या मानहानीच्या जीवनाविरुद्ध विद्रोहाचे भावप्रकटन आले आहे.



'चरित', 'कृतकपुत्र', 'अनिवास'मध्ये त्यांची प्रखर आंबेडकरवादी जाणीव व्यक्त होते. गतकाळाचे वास्तव नजरेसमोर ठेवून वर्तमानाला सामोरी जाणारी त्यांची कविता असून 'आत्मपीडेकडून आत्मशोधाचा प्रत्यय' हा त्यांच्या कवितेचा स्थायिभाव आहे.

'हकिकत' आणि 'जटायू' (१९७२) व 'पोखरण' (१९७९) या त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत. 'हकिकत'मध्ये 'स्व'चे वास्तवदर्शन, तर 'जटायू'मध्ये अंधश्रद्धेला बळी ठरणाऱ्या अस्पृश्यवर्गातील तरुणाच्या मनाची घुसमट दिसते. समाजव्यवस्थेतील जळजळीत अनुभवांची मांडणी त्यात आहे. 'हकिकत' आत्मनिवेदनाचा घाट असलेली, तर 'जटायू', 'आम्ही'च्या समूहभावाने निवेदित होत जाणारी अभिव्यक्ती. 'जटायू' हे एक मिथ आहे. (दुर्बल घटकांसाठी रक्तबंबाळ होणारा रामायणातील 'जटायू'-मिथ.) 'हकिकत आणि जटायू' ही कलाकृती आत्मकथन, स्वकथन, दीर्घकथा की कादंबरी?, असा प्रश्न पडतो, परंतु ही कलाकृती म्हणजे आत्मकथा निवेदन करणारी कादंबरीच होय.

'पोखरण' ही दुसरी कादंबरी. या कादंबरीत आर्य-अनार्य अशा दोन विचारसरणींची मांडणी केली आहे. धम्मिल हा आर्य संस्कृतीचा प्रतिनिधी. जामालिन ही अनार्यांचे प्रतिनिधित्व करणारी टोळी. टोळी समूहाने राहणारा आदिम समाज आपली वसाहत कशी तयार करतो आणि आपल्या संस्कृतीचे रक्षण कसे करतो याचे या कादंबरीत दर्शन होते. 'आदिम प्रवृत्तीच्या असंस्कृत लोकांतील आत्मशोधाच्या जाणिवेतून दलितत्वाचा शोध' हे या कादंबरीचे सूत्र आहे. यालाच 'पुरावास्तवाच्या शोधाचे' सूत्रही म्हणता येईल. या दोन्ही कादंबरी लेखनाच्या प्रयोगामुळे मेश्रामांचे मराठी दलित कादंबरी विश्वातील स्थान अढळ झाले आहे.

मेश्राम यांचे 'खरवड', 'पत्रावळ', 'धगाडा', 'मरणमाळा', आदि नऊ कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या कथालेखनात सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अन्याय-अत्याचार, अपमान, विटंबना, अवहेलना, गुन्हेगारी अशा वास्तवाचे चित्रण आहे. त्यातून दलितत्वाची जाणीव प्रामुख्याने अभिव्यक्त झालेली आहे.

याशिवाय 'सातपुड्यातील खजिना' (१९७८) हा त्यांचा बालकथासंग्रह प्रसिद्ध आहे. प्रा. म.द. हातकणंगलेकर यांनी मेश्रामांच्या निवडक कथांचा 'ज्वाला कल्लोळ' (१९९६) हा संग्रहही संपादित केला आहे. मेश्रामांच्या सर्वच कथांतून समाजवास्तवाचे दर्शन घडते.

'छायाबन' (१९७३), 'रुतलेली माणसे' (१९८२), 'गाळ आणि आभाळ' (१९७९), 'गळतीचे क्षण' (१९९७), 'ओलाव्याचे ठसे' (२००४) इत्यादी ललितगद्यसंग्रहातून दलित जीवनातील दुःखपूर्ण अनुभवाच्या आकांताची मांडणी असली तरी त्यात एक भावस्पर्शी काव्यात्मता आहे. हे ललितगद्य वाचताना 'गद्यकाव्य' वाचत असल्याचा प्रत्यय येतो. ह्या ललित निबंधात चिंतनशीलता, आत्मपरता, उत्कटता, कल्पनारम्यता व सौंदर्यदर्शन इत्यादी गुणांचा मेळ असल्याचे प्रत्ययास येते.


मेश्रामांची 'समन्वय' (१९७९), 'शब्दांगण' (१९८०), 'बहुमुखी' (१९८४), 'प्रश्नशोध' (१९७९), 'साहित्य-संस्कृती मंथन', 'साहित्य प्रवर्तन', 'प्रतिभा स्पंदने' आदी समीक्षेची ग्रंथसंपदा आहे. या समीक्षाग्रंथात संत साहित्य, दलित साहित्य, नवसाहित्य, आधुनिक साहित्य, ग्रामीण साहित्य, शाहिरी वाङ्मय, धर्म संकल्पना, समाज परिवर्तनाची बदलती दिशा, साहित्यातील तात्त्विक, सैद्धांन्तिक व आस्वादनाच्या पातळीवरचे हे समीक्षालेखन आहे. त्यांची समीक्षादृष्टी जशी आस्वादकाची तशीच ती समाजचिंतकाचीही आहे. म्हणूनच त्यांच्या समीक्षालेखनात वाङ्मयाच्या निर्लेप आस्वादनाबरोबरच समाजशास्त्रीय, मानवतावादी, समतावादी, प्रबोधन, आणि परिवर्तनवादी अशाही वृत्तींचा आढळ होतो. 'समन्वय', 'बहुमुखी' तसेच 'विद्रोही कविता' या संपादित काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेतून त्यांचा 'काव्यविचार' प्रामुख्याने व्यक्त झाला आहे. 'डॉ. आंबेडकर चिंतन' (१९९२) व 'दलित साहित्य आणि समाज' (२००५) ही वैचारिक लेखनाची दोन पुस्तके त्यांनी लिहिली. 'डॉ. आंबेडकर चिंतन' या ग्रंथातून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तित्व-विचाराचा वेध घेतला आहे. आंबेडकरी चळवळीचा ज्वलंत इतिहास असून 'दलित साहित्य आणि समाज' या ग्रंथातून दलित साहित्याच्या सामाजिक बांधीलकीविषयीची चर्चा-चिकित्सा आहे.

'विद्रोही कविता' (१९७८), 'वाङ्मयीन प्रवृत्ती : तत्त्वशोध' (२००७) ही संपादने त्यांनी केलेली असून, 'दलित साहित्यातील स्थितिगती' (१९७९) आणि 'नवी विद्रोही कविता' (२००६) ही संपादनेही त्यांनी अनुक्रमे उषा मा.देशमुख आणि डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या सहकार्याने केली आहेत. मुंबई साहित्य संघाच्या अखिल भारतीय साहित्य संमेलन विशेषांकाचे संपादनही त्यांच्या नावावर आहे (१९८६). ही सर्व संपादने त्यांच्या साक्षेपी संपादनाची साक्ष आहेत.

याशिवाय साहित्य – संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ, कायदा व सल्लागार मंडळ इत्यादी मंडळांवर त्यांनी सदस्य म्हणून केलेले कार्य उल्लेखनीय असून महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधन समितीवरही ते सदस्य होते. दूर शिक्षण संस्था, मुंबई विद्यापीठ: एमए (मराठी)च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपुस्तके तयार करवून घेणे आणि मार्गदर्शन करणे हेही कार्य त्यांनी सांभाळले तसेच जनता शिक्षण प्रसारक मंडळ, अलिबाग, जि. रायगड या संस्थेत समन्वयक म्हणून त्यांनी काम केले.

मेश्रामांनी अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले. त्यात अस्मितादर्श लेखक-वाचक मेळावा (१९७८), मुंबई उपनगर साहित्य संमेलन, विलेपार्ले, मुंबई (२००१), कामगार साहित्य संमेलन-अकरावे, पिंपरी, चिंचवड, पुणे (२००४), मराठी कोकणी नवोदितांचे साहित्य संमेलन-नववे, पुणे (२००४), आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलन, नाशिक (२००५) अशा काही महत्त्वाच्या साहित्य संमेलनांचा समावेश होतो. मेश्रामांना वाङ्मयीन योगदानासाठी विविध पुरस्कारही प्राप्त झाले. दलित साहित्यातील कविता व कादंबरी या साहित्यप्रकारांना त्यांचे विशेष योगदान आहे. **–डॉ. शोभा रोकडे**

# शिख समाजाचे नववे गुरू तेग बहादुर



भारताच्या गौरवशाली इतिहासात असे अनेक क्रांतिकारक जन्माला आले, ज्यांनी आपल्या धर्म, संस्कृती, आदर्श आणि मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. या महापुरुषांपैकी नववे शीख गुरू तेग बहादुर सिंग यांचेदेखील नाव आहे. गुरू तेग बहादुर यांना 'हिंदची चादर' असेही म्हणतात. धर्म वाचवण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आज त्यांची पुण्यतिथी आहे.

गुरु तेग बहादुर यांचा जन्म अमृतसर येथे २१ एप्रिल १६२१ रोजी माता नानकी आणि शिखांचे सहावे गुरू हरगोविंद यांच्या पोटी झाला. गुरू तेग बहादूर यांचे बालपणातील नाव त्यागमल होते. ते गुरू हरगोविंद साहिब यांचे धाकटे पुत्र होते. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण आपल्या भावांकडून घेतले. त्यांनी धनुर्विद्या आणि घोडेस्वारीचेही प्रशिक्षण घेतले होते.

गुरू तेग बहादुर यांच्या शौर्याबद्दल असे म्हटले जाते की, एकदा ते कर्तारपूरच्या युद्धानंतर वडील गुरू हरगोविंद साहिब यांच्यासोबत किरतपूरला जात होते. त्या वेळी ते फक्त १३ वर्षांचे होते. मुघल सैन्याच्या एका गटाने त्यांचा पाठलाग केला आणि फगवाडाजवळील पलाही गावात त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या युद्धात त्यांचे वडील गुरु हरगोविंद साहिब यांच्यासोबत गुरू तेग यांनीही मुघलांशी युद्ध केले. लहान वयातच त्यांचे धाडस आणि जिद्द यामुळे तेग बहादुर बनले.

शीख धर्माच्या संदेशांचा प्रसार करण्यासाठी, गुरूंनी भारतभर प्रवास केला आणि अनेक उपदेश केंद्र स्थापन केली. त्यांनी पंजाबमधील चक-नानकी शहराची स्थापना केल्याची माहिती आहे, ज्याचा विस्तार नंतर दहावे नानक गुरु गोविंद सिंग यांनी श्री आनंदपूर साहिब शहरात केला.

गुरू तेग बहादूर यांचा अंत कसा झाला याच्या अनेक आवृत्त्या आहेत, परंतु हिंदूंसाठी त्यांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांचे बलिदान एक प्रकारचे होते यावर जवळपास सर्वच जण सहमत आहेत. १६७५मध्ये जेव्हा गुरू तेग बहादूर यांना दिल्ली येथे फाशी देण्यात आली तेव्हा त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मुघल सम्राट औरंगजेबने हे आदेश दिले होते. पंजाबच्या प्रदेशात शीख चळवळ वाढत होती आणि गुरू लोकांना न्यायपूर्ण समाजासाठी निर्भय राहण्यासाठी प्रोत्साहित करत होते. जो कोणाला घाबरत नाही किंवा कोणाला घाबरत नाही तो खरा शहाणा माणूस म्हणून ओळखला जातो, असे गुरू ग्रंथ साहिबमध्ये नोंदवलेले विधान आहे. शीख इतिहासकारांच्या मते, असे मानले जाते की तेग बहादूरने मुस्लिम राजवट आणि सम्राट औरंगजेब यांना सामाजिक-राजकीय आव्हान उभे केले होते.

गुरू तेग बहादूर यांनी केलेल्या बलिदानाच्या स्मरणार्थ शीख संस्कृतीत नववे नानक यांची पूजा केली जाते आणि २४ नोव्हेंबर हा गुरू तेग बहादूर यांचा हुतात्मा दिवस म्हणून साजरा केला जातो.

गुरू तेग बहादूर यांच्या बलिदानानंतर अनेक पंडितांनी शीख धर्म स्वीकारला. काश्मिरी ब्राह्मणांचं नेतृत्व करणाऱ्या किरपा राम यांनीही शीख धर्म स्वीकारला. शीख अध्येता गुरुमुख सिंह यांनी त्यांच्या 'गुरू तेग बहादूर द ट्रू स्टोरी' या पुस्तकात लिहिलंय की, गुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाने बऱ्याच गोष्टी बदलल्या. यातून भारतीय उपखंडाचा इतिहास बदलला. मानवी हक्कांसाठी लढताना दिलेल्या बलिदानापैकी हे एक मोठे बलिदान होते. आणि इथूनच भारतातील बलाढ्य मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाची सुरुवात झाली. (साभार : इंटरनेट)

# आमदार गणेश नाईकांचा ९० हजार ४११ विक्रमी मताधिक्याने विजय



**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विधानसभा मतदारसंघातून महायुती भारतीय जनता पक्षाचे उमेदवार गणेश नाईक यांचा ९० हजार ४११ विक्रमी मताधिक्याने विजय झालेला आहे. २०१९ च्या निवडणुकीमध्ये तब्बल ७८ हजारांचे मताधिक्य घेऊन लोकनेते नाईक जिंकले होते. २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी स्वतःचाच मताधिक्याचा विक्रम मोडला आहे.

ऐरोली विधानसभा मतदारसंघात लोकनेते गणेश नाईक हे पुन्हा आमदार म्हणून निवडून आले असून २०१९ च्या निवडणुकीत ७८ हजारांची असणारी आघाडी मोडीत काढत ९० हजार ४११ मतांनी आघाडी घेत विजय मिळविला आहे.

ऐरोली मतदार संघातील महायुतीच्या ठाकरे गटाचे उमेदवार मनोहर मढवी यांनादेखील पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

ऐरोली विधानसभा मतदारसंघात झालेल्या चौरंगी लढतीत लोकनेते गणेश नाईक ९० हजार ४११ मताधिक्याने विजयी झाले आहेत. त्यांना एकूण १ लाख ४२ हजार २७३ मते मिळाली तर दुसऱ्या स्थानी अपक्ष विजय चौगुले यांना ५१ हजार ८६२ मते, महाविकास आघाडी उबाठाचे उमेदवार मनोहर मढवी यांना ३७ हजार ७६२ मते, मनसेचे निलेश बाणखेले यांना १६ हजार ७२५ त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांना ८ हजार ६१२ मते मिळाली आहेत. ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या मतमोजणीच्या एकूण ३२ फेऱ्या झाल्या ३२व्या राऊंडपर्यंत लोकनेते नाईक यांनी चार हजाराची आघाडी कायम ठेवत विजयाचा चौकार मारला आहे.

# बेलापूरात आमदार मंदा म्हात्रे विजयी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बेलापूर विधानसभा मतदार संघातील अटीतटीच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार मंदा म्हात्रे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप नाईक यांच्यात प्रमुख लढत झाली. या लढतीत मंदा म्हात्रे यांना ५०२ मतांनी विजय घोषित केले होते. या निकालाला आव्हान देत संदीप नाईक यांनी फेरमोजणीची मागणी केली, मात्र फेरमोजणीतही मंदा म्हात्रे यांचा ३७७ मतांनी निसटचा विजय झाला.



आज सकाळपासून नेरूळ येथील आगरी कोळी भवनमध्ये बेलापूर विधानसभा मतदार संघातील मतपेट्याची मतमोजणी पोलिसांच्या चोख बंदोबस्त मध्ये सुरु झाली. मतमोजणीच्या सुरुवातीला मंदाताई म्हात्रे यांनी नवव्या आणि दहाव्या फेरी पर्यंत आघाडी घेतली होतो. मतमोजणीच्या दहाव्या फेरीत मंदाताई म्हात्रे यांना ३३३४६ तर त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी संदीप नाईक यांना ३०८२२ इतकी मत पडली होती. मतमोजणीच्या १९व्या फेरीत मंदा म्हात्रे पिछाडीवर गेल्या तर २० आणि २१व्या फेरीत पुन्हा म्हात्रे यांनी मतमोजणी मध्ये आघाडी घेतली. अखेर मत मोजणीच्या शेवटच्या टप्यात मंदाताई म्हात्रे विजयी झाल्याचे बेलापूर विधानसभा मतदार संघांचे निवडणुक निर्णय अधिकारी अश्विनी सुर्वे पाटील यांनी घोषित केले.

राज्यातील विधानसभा निवडणुकीचे वारे सुरू झाल्यापासून नवी मुंबईतील विविध पक्षातील इच्छुक उमेदवारांनी देखील कंबर कसत राजकीय गणित मांडण्यास सुरुवात केली होती. यामुळे बेलापूर विधानसभा मतदार संघात मागील दोन महिन्यापासून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे आणि माजी आमदार संदीप नाईक या दोघा पारंपरिक प्रतिस्पर्धीमध्ये हाय होल्टेज ड्रामा बेलापूरमधील मतदाराना पहावयास मिळाला होता. अखेर या लढतीत मंदा म्हात्रे यांनी बाजी मारली.

## निवडक

### करंजाडेतून तरुण बेपत्ता



**पनवेल :** ॲग्रीकल्चर धंद्यामध्ये ३० ते ४० लाख रुपयांचा तोटा झाल्याने एक ३३ वर्षीय तरुण कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. साजन कराळे (३३ रा.करंजाडे) असे या व्यक्तीचे नाव असून बांधा मध्यम, उंची पाच फुट पाच इंच, रंग सावळा, डोक्याचे केस काळे, डोळे काळे असून, त्याला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.उपनि. हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वृद्ध महिला हरविल्याची तक्रार



**पनवेल :** राहत्या घरातून पहाटेच्या सुमारास एक ६२ वर्षीय वृद्ध महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अनुसयाबाई शिर्के (६२ रा.उसर्ली) असे या महिलेचे नाव असून, बांधा सडपातळ, उंची चार फुट पाच इंच, रंग गोरा, डोक्याचे केस काळे पांढरे, डोळे काळे असून, अंगात निळी साडी, लाल ब्लाऊज, पायात काळी चप्पल घातलेली आहे. तिला मराठी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.उपनि. हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करा

## * हिंदु जनजागृती समितीची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील 'शहर आणि औद्योगिक विकास महामंडळा'च्या (सिडको) जमिनीवर बेकायदेशीररित्या उभारलेला दर्गा, तसेच अन्य अनधिकृत बांधकामे प्रशासनाने जमीनदोस्त केली. याच प्रकारे आता नेरूळला असलेली अवैध मशीद तोडण्यात यावी, तसेच शिवडी-लोहगडसह सर्व गडदुर्गांवरील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करावीत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ता सतीश कोचरेकर यांनी केली. ते पनवेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पावसकर उपस्थित होते.



सतीश कोचरेकर पुढे म्हणाले, 'या प्रकारामुळे 'वक्फ बोर्डा'चे षडयंत्रही उघडकीस झाले असून प्रारंभी कोणत्याही जमिनीवर दावा सांगून नंतर ती जमीन कशाप्रकारे बळकावली जाते हे लक्षात येते. या षडयंत्राच्या विरोधात हिंदूंनी आता जागृत होण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात हिंदु जनजागृती समितीच्या वतीने केंद्र सरकारकडेही तक्रार करण्यात आलेली आहे. ज्या प्रकारे आज सिडकोच्या जमिनीवर बेकायदेशीर दर्गा उभा राहिला त्याचप्रकारे नवीन मुंबईतही अनेक ठिकाणी बेकायदेशीर प्रार्थनास्थळे उभी राहिली आहेत. त्या सर्वांवरही कारवाई होणे अपेक्षित आहे.

अशाच प्रकारे किल्ले विशाळगड, किल्ले कुलाबा, किल्ले लोहगड, किल्ले वंदनगड, किल्ला शिवडी आदींवर अतिक्रमणे झाल्याचे लक्षात आले आहे. हिंदु जनजागृती समितीने ही सातत्याने मागणी लावून धरल्यामुळे माहीम किल्ल्यावरील अनधिकृत बांधकामे हटवण्यात आले; मात्र आज राज्यातील ३५ महत्त्वाच्या गड-दुर्गांवरील अशी अनधिकृत बांधकामे झाल्याचे स्वत: राज्य पुरातत्त्व विभागाचे म्हणणे आहे. किल्ले प्रतापगड, माहीम किल्ला आणि नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकामे ज्या पद्धतीने हटवण्यात आली, त्याच राज्यातील ३५ महत्त्वाच्या गड-दुर्गांवरील अशी अतिक्रमणे हटवण्यासाठी तातडीने शासनाने पावले उचलावीत आणि पावित्र्य आणि संस्कृती आबाधित राखावी, अशी मागणी समितीच्या वतीने आम्ही करत आहोत.

# पाम बीच मार्गावरील अपघात रोखण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील या पामबीच मर्गावरील अपघात रोखण्यासाठी उपयोजना करण्याबाबत सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहीत साकडे घातले आहे.

वास्तविकता नागरिकांच्या सोयीकरता निर्माण करण्यात आलेल्या या पाम बीच महामार्गाने गेल्या पंधरा वर्षात हजारो वाहन चालकांचे व सामान्य नागरिकांचे प्राण घेतले आहेत. सदर गतिमान पाम बीच महामार्गाला दुर्दैवाने किलर रोड अशी नवी ओळख मिळत आहे. गेल्या पंधरा वर्षात शेकडो अपघातात हजारो नागरिकांनी आपले प्राण गमावले तर हजारो नागरिकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. वेग मर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवणे, मद्यधुंद अवस्थेत दारू पिऊन वाहने चालवणे, लेनची शिस्त न पाळणे, परिवहन कार्यालयामार्फत जारी केलेल्या नियमांचे उल्लंघन करणे हे देखील वाढत्या अपघातांचे महत्त्वाचे कारण आहे, परंतु या दहा किलोमीटरच्या गतिमान महामार्गावर एकही रस्ता सुरक्षापर संदेश देणारा फलक दिसून येत नाही तसेच वारंवार अपघात होत असताना देखील अपघात झाल्यानंतर तत्काळ अपघातग्रस्तांना वैद्यकीय मदत मिळण्यासाठी पाम बीच मार्गावर एकही रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेत तैनात ठेवलेल्याचे दिसून येत नाही. अशा अनेक दोषयुक्त मार्गामुळे सामान्य नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

देशाचे परिवहन मंत्री या नात्याने किलर रोड-पाम बीच मार्गवाढलेले अपघात रोखण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ती उपाययोजना त्वरित करण्यात यावी यासाठी कचरे यांनी काही उपायोजना सुचविल्या आहेत. यात वेग नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करणे.मद्यपी वाहन चालकांवरती कडक कारवाई करणे. पाम बीच महामार्गावरती अपघातग्रस्तांना वैद्यकीय सुविधा तत्काळ उपलब्ध करण्याच्या दृष्टिकोनातून १०८ क्रमांकाची एक रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे, नवी मुंबई शहरातील सर्व मुख्य रस्त्यांवरती रस्ता सुरक्षा पर संदेश देणारे फलक उभारण्यात यावेत.

नवी मुंबई शहरातील अपघात प्रवण क्षेत्र यांची नागरिकांना जनजागृती करणे. अत्याधुनिक, मनुष्यविरहित सिग्नल यंत्रणेमार्फत वेग मर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई यंत्रणा उभारणे. प्रत्येक सिग्नल थांब्यावर रस्ता सुरक्षा जनजागृती संदेश देणारे ध्वनिप्रक्षेपक यंत्रणा कार्यान्वित करणे. नवी मुंबई महानगरपालिका जाहिरात फलकावर रस्ता सुरक्षापर संदेश देणारे फलक प्रसिद्धी करण्यात याव्यात, अशा विविध उपाययोजना सुचविल्या आहेत.

पान ३ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घडविला इतिहास

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांना एक लाख ८३ हजार ९३१ मते मिळाली त्यांनी ५१ हजार ९१ मतांची आघाडी मिळवत बाळाराम पाटील आणि इतर विरोधकांचा दारुण पराभव केला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या लीना गरड (४३९८९), मनसेचे योगेश चिले (१०२३१), लोकमुद्रा जनहित पार्टीचे कांतीलाल कडू (२४२९), रिप्लब्लिकन सेनेचे संतोष पवार (१७२९), बहुजन समाज पार्टीचे गजेंद्र अहिरे (१५२६), डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नॅशन पार्टीचे वसंत राठोड (१०३८), भारतीय जन सम्राट पार्टीचे पवन काळे (४७७), तर नोटाला ३९०५ मते पडली. दरम्यान, या निवडणुकीच्या अनुषंगाने विरोधकांनाही अपप्रचाराचे रान उठवले होते. मात्र शेवटी पनवेलच्या विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली विकासकामे आणि सामाजिक बांधिलकी आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांची मेहनत कामी आली आहे. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजयानंतर छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकनेते दि. बा. पाटील यांना अभिवादन केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या विजयाबद्दल अगोदरच खात्री दिली होती. आमदार प्रशांत ठाकूर सहज निवडून येतील असा त्यांनी जाहीर दावा केला होता. तो शब्द आणि शब्द तंतोतंत या निकालाच्या रूपातून खरा ठरला. या विजयाने मतदार संघातील जनतेने पुन्हा आपले प्रेम आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावरच असल्याचे दाखवून दिले. पनवेल विधानसभा मतदार संघ हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा मतदार संघ आहे. सहा लाख ५२ हजार ६२ मतदार संख्या असून तीन लाख ८२ हजार ३३५ मतदारांनी मतदान झाले. अपक्षेनुसार सर्वाधिक मते मिळवत आमदार प्रशांत ठाकूर दणदणीत विजय मिळविला. कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेलच्या विकासाचे शिल्पकार आहेत. त्यामुळे त्यांचा विजय नक्की असल्याचा स्पष्ट मत जाणकारांनी व्यक्त केला होता. महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पनवेलची जनता हितचिंतक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आणि हा विजय सहज केला.

या विजयाच्या निमिताने कार्यकर्ते आणि पनवेलच्या तमाम जनतेने जल्लोष करत आणि पेढे वाटत आनंदोत्सव साजरा केला. पनवेलध्ये फटाक्यांची आतषबाजी आणि 'एकच वादा प्रशांतदादा' असा जयघोष सर्वत्र पहायला मिळत होता.

## उरण मतदारसंघात मविआ, शेकापला धूळ चारत आमदार महेश बालदी विजयी

या विजयाने भाजप कार्यकर्त्यांनी जासई येथील विधानसभा निवडणूक कार्याजवळील दास्तानफाटा येथे भाजपचे पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष केला आहे.

उरणचे विजयी उमेदवार महेश बालदी यांची उरण शहरात भिव्य विजयी मिरवणूक निघाली. या वेळी भाजपाचे तालूका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, विजय भोईर, शेखर तांडेल, उद्योजक राजाशेठ खारपाटील, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, राणी म्हात्रे, सुशील राऊत, प्रवीण घासे, कुलदीप नाईक, शशिकांत पाटील, प्रशांत ठाकूर, प्रदीप ठाकूर, चंद्रकांत घरत, मेघनाथ तांडेल, शहराध्यक्ष कौशिक शाह, निलेश पाटील, जविंद्र कोळी, प्रदीप नाखवा यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाकडी गोदामाला आग; लाखोंचे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसी नावडे फाटा जय मातादी हॉटेल जवळ असलेल्या बेकायदेशीर लाकडी गोदामाला लागलेल्या भीषण आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास या गोदामाला अचानकपणे आग लागली. आगीने रौद्ररुप धारण करताच परिसरातील नागरिकांनी तळोजा पोलीस ठाणे व अग्नीशमन दलाला या आगीबाबत कळविले. तातडीने पनवेल, तळोजा, कळंबोली परिसरातील अग्नीशमन बंब घटनास्थळी रवाना झाले व त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून ही आग आटोक्यात आणली.

आगीत लाखोंचे लाकडी सामान भस्मसात झाले असून सुदैवाने जिवीतहानी झाली नाही आहे, परंतु या परिसरातील अशा प्रकारे बेकायेशीर गोदाम उभारण्यात आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भितीयुक्त वातावरण असून अशा गोदामांवर कारवाई करावी, अशी मागणी येथील रहिवाशी करीत आहेत.

# कोपरी गावात घरफोडी; लाखोंचा ऐवज चोरी

**नवी मुंबई :** वाशीतील कोपरी गावात बंद घरातील तीन लाखांची रोख रक्कम आणि दागिने असा सव्वापाच लाखांचा ऐवज चोरण्यात आला. याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे. कोपरी गावातील चिंतामणी सोसायटीत राहणारे राजू ठाकरे (वय ४२) यांचा एपीएमसी मार्केटमध्ये भाजी विक्रीचा व्यवसाय आहे. व्यवसायानिमित्त ठाकरे एपीएमसी मार्केटमध्ये जातात. त्यांचे कुटुंबीय दिवाळीनिमित्त गावी गेले होते. नेहमीप्रमाणे राजू ठाकरे घराला लॉक लावून एपीएमसी मार्केटमध्ये गेले होते. याचदरम्यान चोरांनी घराचे लॉक तोडून त्यांच्या घरातील तीन लाखांची रोख रक्कम, दागिने असा ऐवज चोरला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली वाणिज्य वापराची दुकान गाळा मिळकत ही सदर मिळकतीचे मालक व कबजेदार मधु रोनाल्ड लोबो, रा. पनवेल यांचे नावे तारीख ०८/०४/२०२२ रोजीच्या 'ॲग्रीमेंट फॉर सेल'च्या रजिस्टर्ड कराराने नावे झाली आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेंप्रमाणे:

**'मिळकतीचे वर्णन '**

गाव पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड

| अ.क्र. | दुकान गाळा क्रमाक | कारपेट क्षेत्र | इमारतीचे नाव व मालमत्ता क्र. |
|---|---|---|---|
| १. | शॉप नं. ३ | १६३ चौ. फूट | 'श्री सहाय्य ऑनेस्टी' बिल्डींग, फायनल प्लॉट नं. १९८, शिवाजी चौक, पनवेल, जिल्हा रायगड. |

सदर दुकान गाळा मिळकतीच्या मालक व कबजेदार मधु रोनाल्ड लोबो ह्या वर नमुद केलेली वाणिज्य वापराचा दुकान गाळा शॉप नं. ३ ही मिळकत रजिस्टर्ड 'सेल डिड'ने उक्ती किंमत घेवून विकत देणेंबाबत आमचे अशिलाशी व्यवहार करीत आहेत. आमचे अशिल आणि मधु रोनाल्ड लोबो यांनी सदर खरेदी-विक्री व्यवहाराबाबत हरकती मागविणेकरीता वर्तमानपत्रात 'जाहीर नोटिस' प्रसिध्द करण्याचे अधिकार मला दिलेले आहेत.

तरी सर्व संबंधितांना या 'जाहीर नोटीसी'ने सुचित करण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या वाणिज्य वापराचा दुकान गाळा शॉप नं. ३ या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क-हितसंबंध व अधिकार असल्यास आणि अगर कोणाही व्यक्ती, इसम, संस्थेने मधु रोनाल्ड लोबो आणि अगर पुरोगामी मालक श्री. चित्रसेन पांडूरंग निमकर वगैरे यांचेशी भाडेकरार, साठेकरार, खरेदीखत, विकसन करार, एम.ओ.यू., लिव्ह न्ड लायसन्सी करार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षीसपत्र, अखत्यारपत्र, इच्छापत्र वगैरे अगर अन्य प्रकारे कोणताही कायदेशीर मालकी हक्क-हितसंबंध, ताबेकबजा, वहीवाट वापर वगैरे अधिकार व हक्क निर्माण केला असल्यास अशा व्यक्ती, इसम, संस्थेने सदर 'जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांच्या मुदतीत आपला कायदेशीर हक्क व अधिकार कागदोपत्री पुराव्यानिशी रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.ने माझेकडे सिध्द करावा.

अन्यथा अशी हरकत वर नमुद केलेल्या मुदतीत आम्हास न मिळाल्यास सदर दुकान गाळा शॉप नं. ३ या मिळकतीच्या खरेदी-विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत नसल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर दुकान गाळा शॉप नं. ३ या मिळकतीचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही नोटीस प्रसिध्द केली आहे.

**स्थळ : पनवेल.**
**तारीख : २३/११/२०२४.**

**सही/-**
**सलिल अब्दुरहमान शेख**
**(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**१, स्वप्नपूर्ती, १३४६ बी / १, शाह प्लाझा जवळ, प्रभु आळी, पनवेल, जि. रायगड - ४१०२०६.**



## पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल,जिल्हा - रायगड, पनवेल -४१०२०६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

### जाहीर सूचना

विषय : पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, जाहिरात फलक, पताका, झेंडे, कमानी इत्यादी न लावण्याबाबत.

संदर्भ : जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश.

पनवेल महानगरपालिका हद्दीमधील सर्व राजकीय पक्ष तसेच नागरीकांच्या निदर्शनास आणण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये शहरात कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, जाहिरात फलक, झेंडे, कमानी इत्यादी लागणार नाहीत या दृष्टीने कारवाई करण्याचे तसेच विनापरवानगी अनधिकृत फलक प्रदर्शित करणाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हे दाखलकरण्याचे देखील आदेश दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०२११, दि. ०९/१०/२०२४ अन्वये सार्वजनिक रस्ते, पदपथ, तसेच वाहतुकीला अडथळा ठरणारे अनधिकृत होर्डिंग, बॅनर, पोस्टर्स, विशेष मोहिम घेऊन हटविणेचे आदेशित केले आहे.

तरी पनवेल महानगरपालिका हद्दीमधील सर्व राजकीय पक्ष, नागरीक व सामाजिक संस्था यांना सूचित करण्यात येते की, पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, जाहिरात फलक, झेंडे, कमानी इत्यादी लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी. महापालिका हद्दीमध्ये कोणत्याही ठिकाणी विनापरवागी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग, जाहिरात फलक, झेंडे, कमानी इत्यादी लागल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध "महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५" मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्याची तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम [आकाशचिन्हे (स्कायलाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ मधील तरतुदीनुसार दंड वसूल करण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विनापरवागी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, जाहिरात फलक, झेंडे, पताका, कमानी इत्यादी लागल्याचे निदर्शनास आल्यास शहरातील नागरिकांना खालील माध्यमांवर तक्रारी दाखल करु शकता.

१. **टोल फ्री दूरध्वनी क्रमांक :- १८००२२७७०१**
२. **व्हॉट्सअॅप क्रमांक व एस.एम.एस. सुविधा :- ९७६९०१२०१२**
३. **दुरध्वनी क्रमांक :- ०२२- २७४५८०४०/ ४१/ ४२**
४. **E-mail Id – panvelcorporation@gmail.com**
५. **Complaint Portal – www.panvelcorporation.com**

जा.क्र. पमपा/ जाहिरात व आकाशचिन्ह/२०८२ /२०२४
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२४

सही/-
(मंगेश चितळे)
प्रशासक तथा आयुक्त
पनवेल महानगापालिका

# पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयाचा जल्लोष

## कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून केली फटाक्यांची आतषबाजी | विरोधकांमध्ये सन्नाटा

**कळंबोली : बातमीदार**

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये लाडक्या बहिणीने भाऊबीजचे दान देऊन अन आपल्या पंधरा वर्षाच्या विकसनशील समाजपयोगी कार्यामुळे प्रेरित झालेल्या मतदारांनी घवघवीत मतदान करून पनवेल विधानसभा मतदारसंघातून चौथ्यांदा प्रशांत रामशेठ ठाकूर यांना १,८२,८१८ मतांनी विजयी करून ५०,५८३ चे मताधिक्य देवून निवडून दिले आहे. निवडणुकीचा निकाल हा सकाळपासून लागतच होता.

पनवेलमधील भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये एकच जल्लोष होत होता. एकच वादा प्रशांत दादा, आयेगा तो ठसके प्रशांत दादाच आयेगा, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. निवडणुकीच्या निकाला दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची पूर्ण खबरदारी पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी घेतली होती. विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांना आमने–सामने येऊ न देण्याची खबरदारी ही चांगल्या पद्धतीने घेतल्याने पनवेल विधानसभा निकाला दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही .प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या निकाला दरम्यान मनमुराद आनंद लुटला, मात्र अखेरीस लागलेल्या निकालानंतर विरोधकांचा सुपडा साफ झाल्याने भाजपा कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून फटाक्याची आतषबाजी करत एकच जल्लोष केला. या जल्लोषामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचे पुत्र अपूर्व प्रशांत ठाकूर हे मोठ्या हिरीरीने सहभागी झाले होते.

पनवेल विधानसभा निवडणुकीची मतमोजणी खांदा कॉलनी जवळील कळसेकर अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये करण्यात आली. या ठिकाणी मोठा पोलीस फौज फाटा तैनात करण्यात आला होता. शनिवारी सकाळपासून सुरू झालेल्या मतमोजणीच्या पहिल्या काही फेरीमध्ये अपक्ष उमेदवार बाळाराम पाटील यांनी चांगल्या मतांची आघाडी घेतली होती. त्यामुळे शेकाप कार्यकर्त्यांमध्ये एकच जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र टप्प्या टप्प्याने मतमोजणीच्या फेऱ्या वाढत गेल्या तस तसे बाळाराम पाटील यांचे मताधिक्य कमी होऊन भाजपाचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांनी आघाडी घेतली. पाचव्या सहाव्या फेरीनंतर त्यांनी घेतलेली मतांची आघाडी ही कायम २६ व्या फेरीपर्यंत टिकून राहिली. १५ व्या फेरीनंतर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करण्यास सुरुवात केला. विविध राजकीय गाण्यांच्या ठेक्यावर हजारो कार्यकर्त्यांनी ठेका धरून एकच जल्लोष केला. भाजपच्या कार्यकर्त्यांना पोलीस प्रशासनाकडून महापालिकेचे होत असलेल्या नवीन स्वराज्य इमारती जवळील मोकळ्या जागेस थांबण्यास परवानगी दिली होती. या मोकळ्या जागेमध्ये घोषणां सोबतच मोठ्या प्रमाणावर फटाक्याची व गुलालाची उधळण होत होती. महिला अबाल, वृद्ध ,तरुण कार्यकर्ते हे प्रशांत ठाकूर आगे बढो हम तुम्हारे साथ है, च्या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडत होते. भाजपचा झेंडा आसमतात भिरकावून एक जल्लोषाचे वातावरण या ठिकाणी निर्माण करत होते. या परिसरात हजारो कार्यकर्ते जमल्याने आजूबाजूच्या भागात वाहनांची पार्किंग करण्यात आली होती.

रस्त्यावर वाहतुकीला कोणताही अडथळा निर्माण होऊ नये म्हणून पनवेल पोलीस वाहतूक शाखेने ही चांगला बंदोबस्त तैनात केला होता. या निवडणूक निकाला दरम्यान जमलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या दिमतीसाठी एका मंडपाची ही सोय करण्यात आली होती. आजूबाजूच्या परिसरात रसवाले ,फळ विक्रेते, वडापाव विक्रेत्यांनी ही आपली दुकाने थाटून आपलाही व्यवसाय सकाळपासून ते सायंकाळपर्यंत करून घेतला. जसजसे मतमोजणीच्या फेरी वाढत होत्या मतांची टक्केवारी वाढत होती तसतसा भाजपा कार्यकर्त्यांमधील जल्लोष हा शिगेला पोहोचत होता. याच जल्लोषांमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचे छोटे पुत्र अपूर्व




प्रशांत ठाकूर हेही आपल्या कार्यकर्त्यांसह जल्लोषात सहभागी झाले होते. सजवलेल्या उघड्या मोटारीच्या वर बसून ते मनमुराद आनंद लुटत होते. आपले वडील निश्चितच चौकार मारणार अशा विश्वासाच्या चौकाराचे हात दाखवत ते कार्यकर्त्यांनाही उत्साहित करीत होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदारकीच्या चौकाराने प्रभावित होऊन भाजप कार्यकर्ते मोठ्या जल्लोषात आपला आनंद व्यक्त करत होते. कमळ निशाणी असलेले झेंडे भाजपाचे कार्यकर्ते जल्लोषात फडकवत होते. याच दरम्यान आपला आपला उत्साह आणि आमदारांनी चौकार मारल्याचा आनंद शिट्टी वाजवून व्यक्त करत होते. भाजपचे कमळ जरी जिंकले असले तरी विरोधी असणाऱ्या अपक्ष उमेदवार बाळाराम पाटील यांची असलेली शिट्टी निशाणी चा गजर करून परिसर दणाणून सोडला होता. त्यामुळे जरी विजय कमळाचा झाला तरी गजर हा जल्लोषामध्ये शीट्टीचा होत होता हे दिसून आले. कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह जल्लोष आणि आनंदाचे वातावरण यामुळे निर्माण होते. काही कार्यकर्ते उत्साहाने म्हणत होते की आम्हीच अखेर शिट्टी वाजवली. त्यामुळे कळशेकर महाविद्यालयाच्या बाहेर जमलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या हातात शिट्टी घेऊन गजर होत असल्याने एक सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले जात होते. काहींनी शीट्टी हवेतही भिरकावून दिली, तर काहींनी मुखात घेऊन शीट्टीचा गजर केला आणि अखेर आम्ही वाजवली ना शिट्टी अशा जल्लोषात कार्यकर्ते बोलून आपला आनंद व्यक्त करत होते.

पनवेल विधानसभा मतमोजणीच्या निकालादरम्यान हजारो कार्यकर्ते हे पनवेल महापालिकेचे प्रस्तावित असलेल्या स्वराज्य महापालिकेच्या निर्माणनीत इमारतीच्या मोकळ्या जागेत मोठ्या संख्येने जमले होते .या जमलेल्या हजारो कार्यकर्त्यांमध्ये एका उघड्या सजवलेल्या भाजपचे कमळ निशाणी, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशाचे भाजपाचे अध्यक्ष जे.पी नदा, देवेंद्र फडणवीस यांचा फोटो ने रंगबिरंगी सजलेली उघडा गाडीवरती कार्यकर्त्यांसमवेत आमदार प्रशांत ठाकूर यांचे छोटे पुत्र अपूर्व प्रशांत ठाकूर मोठ्या उत्साहात पूर्ण वातावरणात सहभागी झाले होते. निकाल लागायच्या अगोदरच त्यांनी आपली गाडी वर आपले आजोबा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे चित्र लावून एकटाच बॉस असे लिहून आपला आदर व्यक्त केला होता. तसेच गाडीच्या काचेवर घासून नाय ठासून आलाय आमचा दादा असे लिहिलेले स्टिकर लावले होते. त्यामुळे निकाला अगोदरच ठासून येण्याचा विश्वास हा त्यांनी व्यक्त केला होता. गाडीवर बसून भाजपाचा भला मोठा झेंडा घेऊन ते हवेत डौलदारपणे फिरवत होते. त्यातच हातात धरून फटाक्याची आतषबाजी ही करत होते. चौकारीचा निशाणा दाखवून कार्यकर्त्यांमध्ये जल्लोशही भरत होते. या वेळी त्यांना विचारले असता ते म्हणले की खूप आनंद होत आहे की आमचे पप्पा चौथ्यांदा आमदार होत आहेत. त्यांनी केलेल्या पंधरा वर्षाच्या मोठ्या कामगिरीमुळे त्यांना मतदारांनी निवडून दिले आहे. पुढल्या पाच वर्षांमध्ये ही ते आपली कामे दमदारपणे निश्चितच करणार आहेत असे त्यांनी सांगितले. या वेळी गुलालाची उधळणही मोठ्या प्रमाणावर केली जात होते.

निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर पनवेलमधील सर्व सर्व पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते याची संयुक्त बैठक पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी घेतली होती. त्यावेळी निवडणुकीच्या निकाला दरम्यान कोणतेही पक्ष हमने सामने येऊ नयेत यासाठी त्यांनी कुठे उभे राहावे याची व्यवस्था व सूचना त्यांनी यावेळी दिल्या यामध्ये बीजेपी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे ठाणा नाका बाजूस थांबतील व वाहन हे पुढील सर्विस रोडवर पार्क करतील. शेकाप पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते हे ब्रांचस स्कूल रोडने कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीत प्रवेश करतील व कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मेन गेटच्या आतील बाजूस थांबतील. शिवसेना उबाठा पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे जेएनपीटी सर्विस रोडवर वाहन पार्क करतील व तेथून पुढे सर्विस रोडने बॅरिकेट जवळ थांबतील.

मनसे पक्ष व इतर पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते हे साईनगर येथील सर्विस रोडने पुढे येऊन वाहन पार्क करून आरटीओ पासिंग ठिकाणी थांबतील असे सांगण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी योग्य नियोजन केल्याने निकालाच्या दरम्यान कोणताच अनुचित प्रकार न होता मतमोजणी ही शांततेत व निवडणुकीचा निकाल ही जल्लोषात आणि शांततेमध्ये व्यक्त करण्यात आला.




























उरण : विधानसभा मतदार संघात भाजपचे आमदार महेश बालदी यांना मतदारांचा कौल मिळाला असून आमदार महेश बालदी यांची उरण शहरात भव्य विजयी मिरवणूक निघाली. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये ना. आदिती तटकरेंचा एकतर्फी विजय

## अनिल नवगणेंचा दारूण पराभव















**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभेमध्ये आजपर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडीत काढत महायुतीच्या उमेदवार व मंत्री आदिती तटकरे यांनी ८२,८५४ मतांची विक्रमी आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला आहे. या ठिकाणी महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार अनिल नवगणे यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

महायुतीच्या आदिती तटकरे यांना एक लाख १५ हजार २२६ मते मिळाली आहेत, तर महाविकास आघाडीचे अनिल नवगणे यांना ३३ हजार ३३ मते मिळाली आहेत. याशिवाय मनसेचे फैसल पोपेरे यांना २१०८ मते, अपक्ष उमेदवार राजाभाऊ ठाकूर यांना ४०७० मते, अपक्ष संतोष पवार यांना १३३५ मते आणि अब्दुल कासिम बुराहउद्दीन सोलकर यांना १५७५ मते मिळाली आहेत. निवडणुकीचा एकूण कल पाहता संपूर्ण महाराष्ट्रासह श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये जातीयवादाचा नमुना संपुष्टात आल्याचे पहायला मिळते.

श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये कुणबी समाजाचे मतदान सर्वाधिक असल्यामुळे खासदार शरद पवार यांनी अनिल नवगणे यांना उमेदवारी दिली होती, मात्र कुणबी मतदारांनीदेखील नवगणे यांना फारसा प्रतिसाद दिल्याचे दिसत नाही. श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये महायुतीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी शिवसेना, भाजप, आरपीआय (आठवले गट) यांनी आदिती तटकरे यांच्यासाठी भरभरून काम केल्यानेच हा विजय मिळाल्याचे पहायला मिळत आहे.

आजपर्यंतच्या इतिहासामध्ये एवढे मोठे मताधिक्य घेऊन श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये विजयी होण्याचा मान आदिती तटकरे यांनी मिळवला आहे. मागच्या निवडणुकीत त्यांना ३९,८०० मते मिळाली होती. तीदेखील त्या वेळेला सर्वाधिक मते होती. रायगडचे खासदार सुनील तटकरे; त्याचप्रमाणे आदिती तटकरे यांनी मतदारसंघांमध्ये विकासकामांचा जो धडाका लावला आहे त्याचीच पोचपावती मतदारांनी दिल्याचे बोलले जात आहे.

# चुरशीच्या लढतीत आमदार महेंद्र थोरवे अखेर विजयी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीतील शिवसेनेचे उमेदवार आमदार महेंद्र सदाशिव थोरवे आणि परिवर्तन विकास आघाडीच्या माध्यमातून अपक्ष उमेदवार सुधाकर परशुराम घारे यांच्यामध्ये चुरशीची लढत झाली. यामध्ये आमदार थोरवे ५७६१ मतांनी विजयी झाले.

सुरुवातीला कधी थोरवे, तर कधी घारे यांनी आघाडी घेतली होती, मात्र २०व्या फेरीपासूनच थोरवे यांनी आघाडी घेण्यास सुरुवात केली, ती शेवटच्या फेरीपर्यंत टिकवली. त्यांना ९४ हजार ५११ मते मिळाली. घारे यांना ८८ हजार ७५० मते पडली. याशिवाय शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नितीन सावंत यांना ४८ हजार ७३६ मते मिळवून तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

कर्जत विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी प्रशासकीय भवनामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ठीक ८ वाजता सुरू झाली. सुरुवातीला अपक्ष उमेदवार सुधाकर घारे पहिल्या चार फेऱ्यांमध्ये आघाडीवर होते. त्यानंतर थोरवे यांनी आघाडी घेण्यास सुरुवात केली. पुन्हा सतराव्या, अठराव्या आणि एकोणीसाव्या फेरीत घारे यांची आघाडी होती, मात्र विसाव्या फेरीपासून थोरवे यांनी आघाडी घेतली ती शेवटच्या फेरीपर्यंत टिकवली आणि ते शेवटच्या २६व्या फेरीमध्ये ५७६१ मतांनी विजयी झाले. 'नोटा'ला १९४६ मते मिळाली, तर डमी असलेल्या दोन्ही सुधाकर घारे यांनी ३०७० मते मिळविली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## सुधाकर घारे पराभूत







# आमदार रविशेठ पाटील, आदिती तटकरेंच्या विजयाचा पालीत जल्लोष



**पाली : प्रतिनिधी**

पाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयाबाहेर दुपारी शनिवारी (दि. २३) फटाके फोडून मंत्री आदिती तटकरे आणि आमदार रविशेठ पाटील यांच्या विजयाचा जल्लोष करण्यात आला.

पेण विधानसभा मतदारसंघाचा निकाल जाहीर झाल्यानंतर सुधागड तालुक्यासह पालीत कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पहायला मिळाला. पाली शहरासह ठिकठिकाणी फटाके फोडण्यात आले. याबरोबरच सोशल मीडिया व कमेंट्सची अतिषबाजी पहायला मिळाली. सोशल मीडियावर वाकयुद्ध सुरु झालेले दिसत आहे.



पेण सुधागड रोहा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील हे सुरुवातीपासूनच आघाडीवर होते. शेवटच्या फेरीत त्यांनी तब्बल ६० हजार ८१० मतांनी विजय मिळवला. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. अनेकांनी फटाके आधी आणूनच ठेवले होते. पालीसह सुधागड तालुक्यातील अनेक पदाधिकारी नेते व कार्यकर्ते पेण येथे निकाल ऐकण्यासाठी गेले होते. आमदार पाटील यांच्या विजयाची घोषणा झाल्यानंतर सर्वजण माघारी फिरले आणि आपापल्या ठिकाणी जाऊन गाव पाड्यावर व शहरांमध्ये एकच जल्लोष साजरा करण्यात आला.

# महायुतीच्या विजयाचा खोपोलीत जल्लोष



**खोपोली : विधानसभेवर महायुतीने निर्विवाद बहुमत प्राप्त केल्याच्या पार्श्वभूमीवर खोपोलीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने मध्यवर्ती कार्यालयासमोर फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोष साजरा केला. भाजप महायुतीच्या जयजयकाराच्या घोषणा देण्यात आल्या. या वेळी महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष अश्विनी अत्रे यांच्यासह शहर भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## रमेश धनावडेंना 'कोमपसाप'कडून पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेचा साहित्य प्रथम पुरस्कार रमेश प्रभाकर धनावडे यांच्या 'कवितेच्या सुरातून' या पुस्तकास जाहीर झाला होता. पद्मश्री मधुभाई मंगेश कर्णिक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार धनावडे यांनी रत्नागिरीतील मालगुंड येथे स्वीकारला.

या कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर, कोमसाप विश्वस्त प्रमुख रमेश कीर, केंद्रीय अध्यक्ष नमिता कीर, कार्याध्यक्ष प्रदीप ढवळ, रायगड अध्यक्ष सुधीर शेठ, इतर मान्यवर तसेच अनेक साहित्यप्रेमी उपस्थित होते. कवी केशवसुतांचे जन्मस्थळ असलेल्या वास्तुत हा कार्यक्रम झाला.

रमेश धनावडे यांचे रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे येथे डेप्युटी जनरल मॅनेजर (कॉर्पोरेट अफेअर्स) म्हणून कार्यरत आहेत. आजवर त्यांचे मनतरंग काव्यसंग्रह, ऊर्मी चारोळी संग्रह, जीवनगाणे ललितलेख संग्रह, कवितेच्या सुरातून हा लेखसंग्रह ही पुस्तके प्रकाशित आहेत.

कवितेच्या सुरातून या पुस्तकामध्ये साडेआठशे वर्षापूर्वीचे संतकवी ते आजवरल्या कवींची अशी एकूण ६३ प्रथितयश साहित्यिक कवींची यशोगाथा त्यांनी अधोरेखित केली आहे. त्यांनी माजी विशेष कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र शासन म्हणूनही कार्य केले असून त्यांना आजवर रायगड भूषण पुरस्कार व इतर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेकडून सन्मानित झालेल्या या पुरस्काराबद्दल सर्व स्तरांमधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# आमदार महेंद्र दळवी यांच्या विजयानंतर मुरूड शहरात शिवसेना कार्यकर्त्यांचा जल्लोष

**मुरुड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड रोहा मतदारसंघाचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांचा २९,७०३ मतांनी विजयी घोषित झाल्यावर मुरूड शहरातील शिवसेना कार्यकर्त्यांनी ढोल-ताशा व फटाके आणि एकमेकांना मिठाई भरवत विजयी जल्लोष साजरा केला.

या वेळी श्रीकांत सुर्वे, गिरीश साळी, सागर चौलकर, समीर दवनाक, सुशील ठाकूर, महेश मानकर, विजय पाटील आदींसह शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.



या वेळी प्रतिक्रिया देताना श्रीकांत सुर्वे म्हणाले की, आमदार महेंद्र दळवी यांनी या मतदारसंघात केलेला विकास हा लोकांना भावल्याने मतदात्यांनी मतदानावेळी आपले मत मतपेटीत टाकून आमदार दळवी यांना २९,७०३ मतांनी भरघोस मतांनी विजय केले. आता यापुढे जोराने अलिबाग मुरूड-रोहा मतदारसंघात विकास होईल आणि त्याबरोबर तरुण, तरुणींना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न होणार आहे.



# विजयाचा जल्लोष


























जीवेत् शरदः शतम्!
**विरश्री म्हात्रे**
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा

शुभेच्छुक
ज्योती सिंगासने

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com